Peer Reviewed

ISSN 2319-8648

Indexed (SJIF)

Impact Factor - 7.139

# Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized Higher Education For All Subjects & All Languages

Editor in Chief

Mr.Arun B. Godam

**CURRENT GLOBAL REVIEWER**

**Half Yearly** Nov. 2017-Apr. 2018 | **UGC Approved** | **ISSN : 2319 - 8648**
**Issue X Vol II, Jan. 2018** | **Sr. No. 64310** | **Impact Factor : 2.143**


| | | | |
|---|---|---|---|
| 16 | महिलांचा आर्थिक विकास आणि उद्योजकता | डॉ.सतीश बाबुराव डोंगे | 70 |
| 17 | ॲरिस्टॉटलच्या 'नैतिकसदगुण' संकल्पनेचा अन्वयार्थ | पंडगेसंतोष रमेशराव | 74 |
| 18 | ग्रामीण साहित्य संकल्पना व स्वरूप | प्रा. डॉ. हनुमंत तुकाराम माने | 77 |
| 19 | छाया दातार यांच्या कथेतील अनुभवविश्व | डॉ.सुनीता सांगोले | 81 |
| 20 | स्त्रीउत्थानातील डॉ.बाबासाहेब आंबेडकराच्याकार्य व चळवळीचे योगदान | डॉ.पी.जी. राठोड | 86 |
| 21 | नव्वदोत्तरी स्त्रीवादी कथालेखनातील स्त्रीजीवन | प्रा.डॉ.लक्ष्मण ना.वाघमारे | 90 |
| 22 | सूरकागीतकाव्य | स.प्रा.डॉ. राजेशप्रल्हादरावआरदवाड | 93 |
| 23 | मालती जोशी की कहानियों मेंस्त्री विमर्श | डॉ. लहाडे मुरलीधर अच्युतराव | 98 |
| 24 | औसातालुक्यातील जलव्यवस्थापन : एक भौगोलिक अभ्यास | प्रा.डॉ.आर.एस. धनुश्वर | 102 |
| 25 | बौद्ध धर्म आणि स्त्री जिवन | प्रा.डॉ. बी.एस. लासुरे | 105 |

CURRENT GLOBAL REVIEWER
Half Yearly Nov. 2017-Apr. 2018 | UGC Approved Sr. No. 64310 | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 2.143
Issue X Vol II, Jan. 2018

# छाया दातार यांच्या कथेतील अनुभवविश्व

**डॉ.सुनीता सांगोले**
दयानंद कला महाविद्यालय,लातूर

------------(१९)------------

१९६० नंतरच्या काळात अतिशय प्रभावीपणे आणि वेगळ्या स्वरुपाचे लेखन करणारी लेखिका म्हणून छाया दातार यांचा उल्लेख करावा लागेल. स्त्रीवादी स्वरुपाचे लेखन करताना स्त्रीमनाचे विविध पैलू त्यांनी आपल्या लेखनातून व्यक्त केले आहेत. स्त्रीमुक्ती चळवळीत त्या सक्रिय कार्य करणाऱ्या आहेत. म्हणजे छाया दातार यांचा हॉलंडमधील शिक्षणात फिल्डवर्क, ट्रेड युनियनसारख्या चळवळीत सक्रिय सहभाग, पत्रकार, गृहिणी अशा विविध पातळ्यांवर त्यांनी आपली यशस्वी मुहूर्तमेढ रोवली. प्रत्यक्ष कृतीचा गंध लाभलेले त्यांचे लेखन हे अतिशय संवेदनशील आणि मूलभूत स्वरूपाचे आहे. स्त्रीविषयक अनेक समस्यांचे चित्रण वाचकांना चिंतन करावयास भाग पाडणारे आहे. त्यांच्या कथाविश्वातून त्यांनी स्त्रीचे असलेले 'बाईपण' नाकारुन तिला माणूस म्हणून स्वतंत्रपणे जगण्याचा हक्क त्या मांडतात. त्यांच्या कथांमधून आलेले स्त्रीचे भावविश्व पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

**छाया दातार यांच्या कथांमधून आलेले अनुभवविश्व :**

'वर्तुळाचा अंत', 'गोष्ट साधी, सरळ सोपी' हे त्यांचे कथासंग्रह. या कथासंग्रहातील कथांमधून येणाऱ्या त्यांच्या नायिका अतिशय समर्थपणे उभ्या राहतात. स्त्रियांच्या वेगवेगळ्या भावविश्वाशी त्या समरस होऊन आपले चिंतन प्रकट करताना दिसतात. स्त्रियांविषयीचे हे चिंतन त्यांच्या कथांमधून पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

**स्त्रियांचा एकाकीपणा :**

छाया दातार यांनी आपल्या कथांमधून एकाकी जीवन जगणाऱ्या स्त्रियांच्या दु:खाला वाचा फोडली आहे. पुरुषप्रधान व्यवस्थेमुळे स्त्रियांच्या आयुष्यात आलेले एकटेपण आणि त्यातून तिची होणारी घुसमट त्यांनी आपल्या कथांमधून अतिशय प्रभावीपणे मांडली आहे. 'प्रश्न' (वर्तुळाचा अंत-१९७६) या कथेची नायिका असेच एकाकीपणाला सामोरे जाताना दिसते. कथेची नायिका नलिनी दिसायला अतिशय नाजूक, सुंदर आहे. तिचा नवरा अच्युत हा कम्युनिस्ट पक्षाचा कार्यकर्ता आहे. शिक्षिकेची नोकरी सांभाळून ती मुलांचे शिक्षण व इतर गोष्टी पाहते. निवृत्तीनंतर कांही दिवसातच अच्युतरावांचे निधन होते आणि नलिनी अंथरुण धरते. 'बाबा निघून गेल्यामुळे आईला एकाकी वाटत असावं.' तिच्या आयुष्यात पोकळी निर्माण झाली असावी.' अशी चर्चा मुले करतात. मुलांची ही चर्चा ऐकून नलिनीला मात्र अनेक प्रश्न पडतात. "पोकळी". या पोकळीनेच ओढून घेतलं. वेळच मिळाला नाही समजून घ्यायला. स्वतंत्रपणे राहिले. पुरुषाच्या जिद्दिने संसार सांभाळला आणि शेवटी आधार घेतला. मन ओवाळून टाकलं. एकतर्फीच. काय मिळवलं ? निवारा दिला, सावली राखली, कर्तव्यपरायणता ? म्हणजे काय ? आमचं प्रेम होतं एकमेकांवर ! उभं आयुष्य 'मी' वर तोलुनसुद्धा शेवटी आता एकटं वाटायचं. या एकाकीपणाच्या वाटेवर चालता चालता भेट होईल..... त्यांना घरात भक्ती हवी होती की प्रेम ? बाहेर समानतेचे तत्त्व मानणारा माणूस घरात एकतर्फीच राहायला शिकला ! खरंच आमचं प्रेम होतं, एकमेकांवर ?" (पृ.१२२) लग्न केल्यानंतरही स्त्रियांच्या वाट्याला काही सुख येत नाही. हेच जणू कांही यांना सूचवायचे होते. कारण मुलाबाळांच्या संसारात ही नायिका मात्र पूर्णपणे एकटी असलेली दिसून येते. ती पतिप्रेमासाठी भूकेली आहे. पण पतीने मात्र मुलाबाळांना सांभाळणारी एक गरजेची वस्तू एवढाच तिचा वापर करून घेतला आहे.

'तिघी' (गोष्ट साधी सरळ सोपी) या कथेत तीन पिढ्यातील स्त्रिया भेटतात. आजी, आई मीनाची मावशी आणि मीना अशा चार स्त्रिया आणि त्यांच्या साचलेल्या आयुष्याची ही कथा. कथा नायक अविनाश देशपांडे याला अस्वस्थ करते. या घरातलया या चार स्त्रिया पुरुषाशिवाय जीवन जगतात. " मीनाची आजी भूतकाळात जगत होती. मीनाची मावशी भविष्याकडे पाहत होती आणि मीनाची आई कोणत्याच काळाची जाणीव नसल्याप्रमाणे आला दिवस निपटून काढत होती." (पेज २१) या वाक्यावरुनच या तिघींच्या आयुष्यात असणारा एकटेपणा आपणास लक्षात येतो. पुरुषाशिवाय परंतु तिघी एकत्र असूनही प्रत्येकाच्या जगण्यात एकाकीपणाच आपणास दिसून येतो. एकाकीपणाच्या या वाटेवरचा प्रवास त्यांच्या नायिकांना आत्ममग्न करताना दिसतो. त्या एकटेपणातून स्वतःच्या अस्तित्त्वाचा शोध घेताना दिसतात. एकटेपणातून आलेल्या त्यांच्या जाणिवा या अतिशय प्रगल्भ, संवेदनशील असलेल्या दिसतात.

" तू परक्या मुलांच्यात मिसळावं हे मला बरं वाटत नाही." (पृ.७९) असे म्हणणारा 'कलम' (गोष्ट साधी सरळ सोपी)' या कथेतील नायक म्हणजे स्त्रीच्या स्वातंत्र्याचा अपमानच करणारा वाटतो. तसेच 'आउटसायडर' या कथेतील तो तिच्यावर जीवापाड प्रेम करतो पण तो तिचे शरीर आणि मन वेगळे करूच शकत नाही.

बायकोवरच्या संशयाने पछाडलेला नायक 'सत्य' या कथेतून अतिशय प्रभावीपणे लेखिकेने साकारला आहे. त्याचा पुरुष असण्याचा अहंकार प्रखरतेने व्यक्त करताना तो म्हणतो, " तिला दरदरून ओढत आणावी आणि नागवी करून तिच्यावर बलात्कार करावा. माझा अपमान ? मी एक पुरुषोत्तम! मी एक पूर्ण पुरुष ! मी एक पोलादी पुरुष ! मी शंकर मुलांचा होऊ इच्छिणारा जन्मदाता ! माझ्या घरात एक कावळ्याने अंडी घालावीत." अशा प्रकारची स्त्रीकडे तुच्छतेने पाहण्याची पुरुषाची मुजोर वृत्ती लेखिकेने स्पष्ट केली आहे. (पृ.१३४) 'मी, मी पुरुष आहे. माझे पौरुष परिपूर्ण आहे. सृजनाची ताकद असलेले." (पृ.१७०) मुलांना जन्म देणी हा त्याचा पुरुषार्थ अशी भावना व्यक्त करणारा नायक 'हा कोंभ उदरीचा' या कथेतून साकार होतो.

विवाहसंस्थेने स्त्रीला एक वस्तुरुप प्राप्त करून दिले आहे. लग्नाच्या बाजारात बायको म्हणजे एक वस्तू आहे आणि केवळ वस्तूच नव्हे तर त्या वस्तूला मूल्य आहे. लग्नात तिच्याकडून मिळणारा भरपूर हुंडा, गाडी, बंगला या गोष्टींसाठी 'गोष्ट साधी सरळ सोपी' या कथेचा नायक कोणीतरी गब्बर मोठा सासरा गाठण्याची भाषा करतो. संध्याकाळी फिरायला जातना केवळ फेमिनाईन कंपनी असली की बरं वाटतं म्हणून पोरी फिरवणं यात या नायकाला गैर कांहीच वाटत नाही. बायको म्हणून बायकोसंदर्भात असणाऱ्या त्याच्या कल्पनाही अशाच पुरुषीपणाच्या आहेत. त्याला स्वतंत्र बुद्धीची बायकोही नकोय. शालीन, हळवी आणि त्याच्या इशाऱ्यावर नाचणारी कळसुत्री बाहुली त्याला बायको म्हणून हवी आहे. 'लाराची गोष्ट' (वर्तुळाचा कंस) या कथेतही मैत्रिण आणि बायको या दोघींकडे पाहण्याचा पुरुषी दृष्टीकोन लक्षात येतो.

मुळातच स्त्री म्हणजे पुरुषांच्या इशाऱ्यावर चालणारं एक चालतं बोलतं मशिन आहे. अशाच समग्र पुरुष जातीचा समज आपल्या परंपरने करुन दिला आहे पुरुषाला ती जशी हवी तशीच ती वागली पाहिजे. त्या ठराविक चौकटीच्या बाहेर जावून तिचे वागणे म्हणजे तिचा खूप मोठा अपराध अशा आशयाचा एकंदर संपूर्ण पुरुषकेंद्री दृष्टीकोन छाया दातार यांनी आपल्या कथांचा विषय केला आहे.

**निष्कर्ष :**

१. छाया दातार यांच्या कथा स्त्रीभावविश्वाशी समरस होऊन त्याबद्दलचे चिंतन अभिव्यक्त करतात.
२. पुरुषप्रधान समाजव्यवस्थेने स्त्रियांच्या आयुष्यात आलेले एकटेपण छाया दातार यांनी प्रभावीपणे मांडले.
३. विवाहसंस्थेतील दांभिकपणा, विसंगतीवर परखड भाष्य करणाऱ्या ह्या कथा आहेत.
४. सुशिक्षित नोकरी करणाऱ्या स्त्रियांची होणारी घुमसट आणि त्यांचे प्रश्न मांडणाऱ्या कथा आहेत.
५. स्त्रियांकडे साधन म्हणून पाहण्याचा पुरुषी दृष्टीकोन या कथा उघड करतात.
६. स्त्रियांचे अनुभवविश्व साकारण्यात छाया दातार यांच्या कथा यशस्वी ठरतात.

**संदर्भसूची :**

१. वर्तुळाचा अंत - छाया दातार
२. गोष्ट साधी, सरळ, सोपी - छाया दातार
३. स्त्रियांची नवकथा : वाटा आणि वळणे - मंगला वरखेडे
४. स्त्रियांच्या नव्वदोत्तरी कथा : स्त्रीवादी आकलन- मंगला वरखेडे

# Current Global Reviewer

ISSN 2319-8648

Peer Reviewed

Impact Factor - 7.139

UGC Approved Journal
Sr. No. 64310

ISSN 2319-8648



Edited By
Arun B. Godam
Latur, Dist. Latur-413512
(Maharashtra, India)
Mob. 8149668999

SHAURYA PUBLICATION
Latur
Publisher
Shaurya Publication

www.rjournals.co.in